# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

मस्ट READ

# मागण्यापेक्षा रोजगार देणारे व्हा : पाटणकर

लोकमत न्यूज नेटवर्क

पाटण : महाविद्यालयातील विद्यार्थी शिक्षण घेत असताना करिअर घडविण्यासाठी योग्य मार्गदर्शनाच्या शोधात असतो. त्याला पाटण महोत्सवामध्ये विविध स्टॉल हे योग्य मार्गदर्शन करण्यास फायदेशीर ठरतील. त्यातून त्यांनी प्रेरणा घेऊन आपला स्वतःचा व्यवसाय निर्माण करावा. या पाटण महोत्सवामुळे रोजगारनिर्मितीला चालना मिळेल. विद्यार्थ्यांनी रोजगार मागण्यापेक्षा रोजगारनिर्मिती करणारे झाले पाहिजे,' असे प्रतिपादन माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले.

पाटण महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव मस्के, कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, जॉइंट सेक्रेटरी डॉ. सुहास देशमुख, संचालक याज्ञसेन पाटणकर, संजीव चव्हाण, दादासाहेब जाधव, शरद देशमुख, पृथ्वीराज पाटील, प्रभारी प्राचार्य डॉ. विलास कळंत्रे, डॉ. हेमलता काटे उपस्थित होते.

विक्रमसिंह पाटणकर म्हणाले, 'छोट्या-छोट्या उद्योगांतून मोठा उद्योग निर्माण होत असतो. सुरुवातीला लहान उद्योगापासून सुरुवात करावी. स्वयंनिरीक्षण, अनुभव यांतून आपला नवीन उद्योग उभा करावा. उद्योग वाढवून आपल्यासोबत समाजाची प्रगती करावी. उद्योगाच्या माध्यमातून रोजगार कसा निर्माण होईल, याकडेही आपण लक्ष दिले पाहिजे. पाटण तालुक्यात वनपर्यटनामध्ये मोठी संधी आहे. स्थानिक युवकांनी याचाही फायदा करून घेऊन घ्यावा. या पाटण महोत्सवातील सर्व स्टॉलला भेट देऊन नवीन तंत्रज्ञान, शेती, गृहोद्योग, लघुउद्योग यांतून आपल्याला साजेसा असा उद्योग उभा करावा आणि त्यातून परिसरातील अनेकांना रोजगार निर्माण कसा होईल, याकडे कटाक्षाने पाहावे.' यावेळी पाटण तालुक्यातील महाविद्यालयीन तरुण-तरुणी तसेच उद्योग, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



पाटण महोत्सवाचे उद्घाटन माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कुलगुरू प्रा. डॉ. ज्ञानदेव मस्के, अमरसिंह पाटणकर, डॉ. सुहास देशमुख, याज्ञसेन पाटणकर उपस्थित होते. छाया : प्रवीण जाधव